भोगवटा प्रमाणपत्र
OCCUPANCY CERTIFICATE

जा.क्र:नामप्रविप्रा/भोगवटा/मौ.भगुर,ता.नाशिक/ग.नं.७६/८/१/ २०११ दि.३०/९/२०२२

प्रति,

मे. मनोज बिल्डर्स भागीदार संस्था तर्फे
भागीदार श्री. सदानंद एकनाथ शेटे
रा. भगुर, ता.जि.नाशिक,
व्दारा - इंजि. बहीरु मोजाड

मौजे भगुर, तालुका नाशिक, जिल्हा नाशिक येथील गट नं. ७६/८/१ मधील एकुण क्षेत्र १९५०.०० चौ.मी. मधील क्षेत्रास **रहिवास व वाणिज्य** प्रयोजनार्थ इमारतीचे बांधकाम करण्यासाठी या प्राधिकरणाचे पत्र.क्र. नामप्रविप्रा/बां.प./मौ.भगुर,ता.नाशिक/ग.नं.७६/८/१/६५२, दि. ०४.०७.२०१९ अन्वये आपणास बांधकाम परवानगी देण्यात आली आहे. यावेळी आपण खालील प्रमाणे रक्कमा जमा केलेल्या आहेत.

अ.क्र.	चलनाचा प्रकार	चलन क्र. व दि.	रक्कम	भरल्याचा दिनांक
१	छाननी शुल्क	१२०/२५.११.२०१७ १४६/०९.०५.२०२२	११,७००/- ९,८००/-	२९/११/२०१७ ११/०५/२०२२
२	प्रिमिअम आकारणी	३४६/०९.०६.२०१९	२,४८,४५०/-	१४/०६/२०१९
३	विकास शुल्क	३४५/०९.०६.२०१९	१,०८,८३०/-	१४/०६/२०१९
४	कामगार कल्याण उपकर	१०६/०९.०६.२०१९	३,४२,६२०/-	१४/०६/२०१९
५	सुरक्षा ठेव रक्कम	९५/०९.०६.२०१९	३८,९४०/-	१४/०६/२०१९

उपरोक्त परवानगी प्रमाणे आपण श्री. बहीरु मोजाड परवानाधारक वास्तुविशारद/ स्ट्रक्चरल अभियंता/ सुपरवायझर यांच्या देखरेखीखाली इमारतीचे बांधकाम केले असलेबाबत व या इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र मिळणेबाबत या प्राधिकरणास दि. ११.०५.२०२२ रोजी अर्ज केल्यावरुन आपणास खालील इमारतींना खाली नमूद केलेल्या तपशिल व अटींस अधीन राहून भोगवटा करणेस संमती देण्यात येत आहे.

भोगवटा प्राप्त इमारतीचा तपशिल

Building Type	तळमजला	पहिला मजला	दुसरा मजला	तिसरा मजला
Building A	६८.३७ चौ.मी.	९८.३६ चौ.मी.	निरंक	निरंक
Building B	५१.९१ चौ.मी.	निरंक	निरंक	निरंक
Building C	७६.५६ चौ.मी.	५५०.५० चौ.मी.	५५०.५० चौ.मी.	५५०.५० चौ.मी.

अटी व शर्ती:-

१) अर्जदार यांना उक्त इमारतींमधील सामाईक जागा उदा. रेफ्युज एरिया, सामाईक पार्किंग, टॉप टेरेस, सामासिक अंतरे इ. बंदिस्त करता येणार नाही. अथवा विकता येणार नाही. सदरचे क्षेत्र सर्व लोकांसाठी खुले ठेवणे अर्जदारांवर बंधनकारक राहील.

२) अर्जदार यांना नकाशात दर्शविलेली लगतचा टेरेस बंदिस्त करता येणार नाही.

३) रेखांकनातील रस्ते, गटारे, खुली जागा इत्यादी अर्जदारांनी जागेवर स्वखर्चाने व समाधानकारकरित्या विकसित करणे आवश्यक आहे.

४) बांधकाम मंजुरीच्या आदेशातील तसेच अकृषिक परवानगी आदेशातील सर्व अटीं व शर्ती अर्जदार/विकासक/जमीन मालक यांचेवर बंधनकारक राहतील.

५) प्रस्तुत प्रकल्पाकरिता सक्षम प्राधिकरणाने / ग्रामपंचायतीने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा न केल्यास पिण्याच्या पाण्याची आवश्यक ती पूर्तता स्वखर्चाने करणे अर्जदार /जमीन मालक/ विकासक यांचेवर बंधनकारक राहील.

६) प्रस्तुत जमिनीवर भविष्यात छाननी शुल्क, प्रिमियम शुल्क, विकास शूल्क इत्यादी बाबतच्या रक्कमेची बाकी उदभवल्यास सदर रक्कम प्राधिकरणाकडे जमा करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

७) भोगवटा प्रमाणपत्र दिलेल्या बांधकामामध्ये प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय काही बदल केल्यास व यामुळे काही दुर्घटना घडल्यास त्यास सर्वस्वी अर्जदार / जागा मालक जबाबदार राहतील.

(राजेश महाले)
उपमहानगर नियोजनकार,
नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
नाशिक

प्रत:- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

तलाठी भगुर, ग्रामसेवक भगुर ग्रामपंचायत, ता.जि.नाशिक यांना माहितीसाठी व घरपट्टी आकारणीसाठी.